MHJN100002372025

## निशाणी क्र. १७ खालील आदेश

**(पारित दिनांक ०२/०८/२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी त्यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांचा लेखी जबाब स्विकारण्याबाबत दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी असे कथन केले आहे की, प्रकरणात प्रतिवादी क्र. १० व ११ हजर झाले असून प्रकरण त्यांचे लेखी जवाब व म्हणने दाखल करण्यासाठी ठेवण्यात आलेले होते. परंतु वेळेवर आवश्यक कागदपत्र उपलब्ध न होऊ शकल्यामुळे व प्रतिवादी क्र. १० हे आजारी असल्यामुळे विहित मुदतीत त्यांचा लेखी जवाब व से दाखल करु शकले नाहीत. तरी प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी जाणुनबुजून लेखी जबाब व से दाखल करण्यास विलंब केलेला नसुन सदर विलंब क्षमापीत करुन त्यांची बाजु मांडण्याची संधी देउन त्यांचा लेखी जबाब व से स्विकारण्याची संधी देण्याची विंनती केली.

०३. वादींनी सदर अर्जास तिव्र आक्षेप घेतला व कथन केले की, प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी जानीवपूर्वक विलंब केलेला असून प्रकरणात विलंब माफी बाबत कोणतेही संयूक्तीक कारण नमुद केले नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विंनती केली.

०४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.

१० व ११ यांना प्रस्तुत प्रकरणात त्यांचा लेखी जबाब व से दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र. १० हे आजारी असल्यामुळे व प्रतिवादी क्र. ११ यांच्याकडून काही महत्वाची दस्त उपलब्ध न झाल्यामुळे त्यांचा लेखी जबाब व से मुदतीत दाखल करु शकले नाही. तसेच मूळ दाव्यातील वादविषय पाहता प्रस्तुत दावा हा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी तसेच गुणदोषावर निकाल होणेकरिता प्रतिवादी क्र. १० व ११ यांचा लेखी जबाब पटलावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील अर्ज योग्य तो दंड आकारुन मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, प्रतिवादीवर योग्य ती दंडाची रक्कम आकारुन प्रतिवादी क्र. १० व ११ यांचा विलंब क्षमापित करुन लेखी जबाब व से स्विकारणे योग्य होईल, असे माझे मत झाले आहे. करिता, मी पुढीलप्रमाणे आदेश करते.

## आ दे श

१. प्रतिवादी क्र. १० व ११ यांचा अर्ज **मंजुर** करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी दंड म्हणून रक्कम रुपये १००/– वादीस द्यावेत.

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2025.08.02 13:23:33 +0530

ठिकाण– मंठा
दिनांक– ०२/०८/२०२५

(श्रीमती एल.पी. धन्वे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मंठा